सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य बाल नाट्यमहोत्सव
# नियम-२००२

**सांस्कृतिक कार्य संचालनालय**
जुने मंत्रालय विस्तार भवन, पहिला मजला
महात्मा गांधी मार्ग, मुंबई ४०० ०३२
दूरध्वनी क्र. २८४ २६ ३४/२८४ २६ ७०
२०४ ३५ ५०/२०४ ३५ ७१

# महाराष्ट्र राज्य बाल नाट्यमहोत्सव
# नियम - २००२

एन १३१४—१

सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**बालनाट्य स्पर्धा नियमावली मंजुरीबाबत.**

## महाराष्ट्र शासन

**सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य क्रीडा व विशेष सहाय्य विभाग**

शासन निर्णय क्रमांक बानास्प. २००२/प्र.क्र. ८४/सां. कां. १

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२, दिनांक १७ ऑगस्ट २००२.

**वाचा.**––(१) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्रमांक बानास्प. २००१/प्र.क्र. १८८/सां.का. १, दिनांक १३ डिसेंबर २००१.

**शासन निर्णय :** महाराष्ट्रातील रंगभूमी समृद्ध करण्यासाठी शासनातर्फे व्यावसायिक/हौशी नाट्यस्पर्धेप्रमाणे बालनाट्य शिबिराचे आयोजन दरवर्षी केले जाते. त्याचप्रमाणे रंगभूमीस उत्तम रंगकर्मींची कमतरता भासू नये आणि लहान वयातील कलाकारांतील कलागुणांना उत्तेजन व प्रोत्साहन देऊन भावी काळात त्यांच्यामधून उत्तमोत्तम कलाकार निर्माण व्हावेत या उद्देशाने बाल नाट्यस्पर्धेचे आयोजन तीन केंद्रांत करण्यासाठी येणाऱ्या खर्चास शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्रमांक बानास्प. २००१/प्र.क्र. १८८/सां.का. १, दिनांक १३ डिसेंबर २००१ अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे. या बालनाट्य स्पर्धेमध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी नियम व अटी, पारितोषिके, परिक्षक नियुक्ती, त्यांचे मानधन, प्रवास खर्च इत्यादी देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता. विचारांती शासन या शासन निर्णयासोबत जोडलेल्या बाल नाट्यस्पर्धेच्या आयोजनाबाबतच्या नियमावलीस मान्यता देत आहे.

२. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ८१३/०२/व्यय-१४, दिनांक १ ऑगस्ट २००२ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**म. दि. आडिवरेकर,**

शासनाचे अवर सचिव.

प्रति,

आयुक्त, सांस्कृतिक कार्य, मुंबई.

महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई /नागपूर.

अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.

निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.

महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई.

वित्त विभाग (व्यय-१४), मंत्रालय, मुंबई.

निवड नस्ती, सां.का. १.

(शा.म.मु.) एन १३१४––२ (१,०००––९-२००२)

# महाराष्ट्र राज्य बाल नाट्यस्पर्धा नियम, २००२

## परिशिष्ट ''अ''

महाराष्ट्र राज्यात सदरील नामाकिधाने प्रारंभ होत असलेल्या महोत्सवांतर्गत बाल नाट्यस्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्यानां आपापल्या संस्थांचे अर्ज खालील नियम व अटी पूर्ण होत असतील तरच आपली प्रवेशिका सादर करावी.

### पात्रता

१. (अ) संस्था नोंदणीकृत असून कमीत कमी तीन वर्षे अस्तित्वात असली पाहिजे. तथापि संस्थेचे कार्य सृजनीशील असून बालरंगभूमीस पोषक असल्यास हा कालावधी शिथिल करण्याचे अधिकार आयुक्त/संचालक, सांस्कृतिक कार्य यांस असतील.

(आ) प्राथमिक, माध्यमिक विद्यालय, शाळा यांना प्रवेश अर्ज करता येईल. अर्जदार संस्थेस शक्यतोवर जिल्हा पातळीवर किमान एक पारितोषक मिळाले असले पाहिजे.

(इ) कमीत कमी पाच स्वीकारपात्र प्रवेशिका आल्याखेरीज स्पर्धेचे आयोजन केले जाणार नाही.

### प्रवेशिका

२. (अ) बाल नाट्यस्पर्धेत भाग घेणाऱ्या संस्थेला/शाळा/विद्यालय यांना विहीत नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे.

(आ) प्रत्येक संस्थेस/शाळा/विद्यालयास जास्तीत जास्त १ बाल नाट्यस्पर्धेत उतरविता येईल.

(इ) स्पर्धक संस्थांनी/शाळांनी/विद्यालयांनी योजलेल्या नाटकाच्या संहितेची एक सुवाच्च प्रत प्रवेशिकेसोबत पाठवावी लागेल. प्रत सुवाच्च नसल्यास प्रवेशिका स्वीकारली जाणार नाही.

(ई) प्रवेश अर्ज भरतेवेळी स्पर्धेत सादर करण्यात येणाऱ्या नाटकाचा प्रयोग पूर्वी झाला असण्याची आवश्यकता नाही. नाटकाचा पहिला प्रयोगसुद्धा स्पर्धेत सादर करता येईल.

(उ) संस्थेला/शाळेला/विद्यालयाला त्यांनी योजिलेल्या नाटकाच्या बाबतीत रंगभूमी प्रयोग पूर्व परिनिरिक्षण मंडळाचे प्रमाणपत्र पाठवावे लागेल. असे प्रमाणपत्र प्रवेशिकासोबत सादर केलेले नसेल तर प्रवेशिका स्वीकारण्यात येणार नाही.

(ऊ) प्रवेश अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रात संस्थेने आपल्या नाटकात काम करणाऱ्या सर्व कलाकारांची संपूर्ण व बरोबर नावे, वय ते करीत असलेल्या भूमिकांच्या निर्देशासहित पाठवावी लागतील. नाटकाच्या दिग्दर्शनाची तसेच नेपथ्य, प्रकाश योजना, पार्श्व संगीत, वेशभूषा, लेखन, रंगभूषा, इत्यादीची जबाबदारी उचलणाऱ्या व्यक्तिंचीही नावे पाठवावी लागतील. नंतर त्यात काही बदल झाल्यास सुधारित नावे स्पर्धा सुरू होण्यापूर्वी तीन आठवडे पाठवावी लागतील.

एन १३१४—२अ

(ए) संस्थेला त्यांनी योजिलेल्या नाटकाचे स्वरूप विशेषतः ते नाटक स्वतंत्र आहे किंवा भाषांतरीत आहे किंवा दुसऱ्या नाटकाचे रूपांतर आहे हे त्या मूळ नाटकाचे लेखक, त्या मूळ नाटकाची भाषा यांचा निर्देश इत्यादी बाबी कळवाव्या लागतील. नाटक, कथा, कादंबरी इत्यादी किंवा अन्य वाङ्मय प्रकारावर आधारीत असेल तर तसाही उल्लेख करावा लागेल. संस्थेला/शाळेला/विद्यालयाला त्यांनी योजिलेले नाटक नवीन असल्यास व ते बाल नाट्यमहोत्सवाकरिता खास लिहिलेले असल्यास तसा स्पष्ट उल्लेख करावा लागेल.

(ऐ) बाल नाट्यस्पर्धेत सादर करण्यात येणाऱ्या नाटकाच्या लेखकाचे अनुमतिपत्रक प्रवेशिकेसोबत जोडणे आवश्यक आहे. नाटक भाषांतरीत, रुपांतरीत अथवा आधारित असल्यास मूळ लेखकाचेही अनुमतिपत्रक प्रवेशिकेसोबत जोडावे लागेल.

(ओ) स्पर्धेत संस्थेला अनामत रक्कम म्हणून रुपये १०० चा धनाकर्ष प्रवेश अर्जासोबत जोडावा लागेल. धनाकर्ष आयुक्त/संचालक, सांस्कृतिक कार्य, मुंबई यांच्या नावे असेल. ज्या स्पर्धक संस्था/शाळा/विद्यालय पूर्ण बाल नाट्य प्रयोग सादर करतील त्यांना प्रवेशिकेसोबत अनामत रक्कम म्हणून रुपये १०० चा जोडलेला धनाकर्ष परत पाठविण्यात येईल. ज्या संस्था/शाळा/विद्यालय ऐनवेळी प्रयोग रद्द करतील त्यांच्या अनामत रकमा शासकीय कोषागारात जमा करण्यात येतील.

(औ) पूर्ण बाल नाट्य प्रयोग करणाऱ्या स्पर्धक संस्थेस नेपथ्य, प्रकाश योजना, साहित्याची वाहतूक, हमाली, नाटकाचे आकर्षक सेट्स इत्यादीसाठी नाट्य निर्मिती खर्च म्हणून रुपये ३,००० इतकी रक्कम देण्यात येईल.

(अं) १५ वर्षांखालील बाल कलाकारांसाठी ही स्पर्धा आहे. तथापि, तंत्रज्ञ यांच्याबाबतीत वयाची अट शिथील करण्यात येईल.

**नाटकाचे स्वरूप, कालमर्यादा वगैरे**

३. (अ) स्पर्धेसाठी सूचविलेले नाटक स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अंतिम अधिकार शासनास राहील. स्पर्धेसाठी सूचविलेले नाटक शासनाने नाकारल्यास त्याची कारणे देण्याचे शासनावर बंधन राहणार नाही.

(आ) संस्थेने/शाळेने/विद्यालयाने योजिलेले बाल नाटक पूर्वी बाल नाट्यमहोत्सवात सादर केलेले असल्यास व ते पूर्वी पारितोषिक पात्र ठरलेले असल्यास तेच बाल नाटक त्याच संस्थेला/शाळेला/विद्यालयाला परत करता येणार नाही. मात्र इतर संस्थेला/शाळांना/विद्यालयांना ते बाल नाटक सादर करता येईल.

(इ) कोणत्याही बाल नाटकाची कालमर्यादा मध्यंतरासह ६० मिनिटांची असेल. मध्यंतर १५ मिनिटांचे असेल. एका बाल नाट्यास आवश्यकता असल्यास फक्त एकच मध्यंतर असेल. प्रतिदिन २ बाल नाट्य प्रयोग स्पर्धेत सादर करण्यात येतील.

## नाट्यसंस्थांचा प्रवास व इतर खर्च

४. (अ) बाल नाट्यमहोत्सवाकरिता निवडलेल्या स्थानिक संस्थेला/शाळेला/विद्यालयाला प्रवास खर्च व दैनिक भत्ता देण्यात येणार नाही. परंतु ज्या संस्थाना/शाळांना/विद्यालयांना त्यांच्या नोंदविलेल्या कार्यालयाच्या ठिकाणाहून दुसऱ्या गावी नाटक सादर करण्यास सांगितले गेल्यास त्यांना होणारा जाण्या-येण्याचा प्रवास खर्च व जेवण्या-राहण्याचा खर्च देण्यात येईल. तथापि, हा खर्च प्रत्येक संस्थेच्या संघटक, दिग्दर्शक,पार्श्वसूचक, कलाकार, तंत्रज्ञ इत्यादी २८ कलाकारांच्या मर्यादेत राहून दरडोई रुपये २०० प्रमाणे रुपये ५,६०० अथवा प्रत्यक्ष खर्च यापैकी जे कमी असेल ते त्यांच्या मर्यादेत देण्यात येईल. खर्चाची परिपूर्ती नाटकात भाग घेणाऱ्या व प्रवेशिकेत दिल्याप्रमाणे त्यातील भूमिका करणाऱ्या कलावंताच्या संख्येपुरतीच नियम क्र. ४ (आ) प्रमाणे मर्यादीत असून याशिवाय दिग्दर्शक, पार्श्वसूचक, संघटक वगैरे इतर आठ जणांचा यात समावेश करता येईल. संस्थेने खरेदी केलेल्या रेल्वे/एस.टी. तिकिटांचे अनुक्रम दाखविणे आवश्यक राहील.

(आ) बाल नाट्य स्पर्धेत सादर होणाऱ्या नाटकातील भूमिका करणाऱ्या जास्तीत जास्त २० कलाकरांना प्रवास खर्च व जेवण्या-राहण्याचा खर्च देण्यात येईल.

५. (अ) प्रवेशिका विहित नमुन्यानुसार संपूर्ण आवश्यक माहिती व कागदपत्र देऊन प्रवेशिकांच्या दिलेल्या मुदतीत पाठविली पाहिजे. दिलेल्या मुदतीत प्रवेशिका पाठविली नाही तर विचारात घेतली जाणार नाही.

(आ) बाल नाट्य महोत्सवाकरीता निवडल्या गेलेल्या संस्थेला/शाळेला/विद्यालयाला आपले बाल नाटक दिलेल्या दिवशी दिलेल्या ठिकाणी व दिलेल्या वेळी सादर करावे लागेल. कुठल्याही कारणास्तव बाल नाट्यमहोत्सवाकरीता निवडले गेलेले नाटक रद्द न करण्याची हमी संस्थेला/शाळेला/विद्यालयाला द्यावी लागेल. शासनाने सांगितल्याप्रमाणे संस्थेनी प्रयोग न केल्यास रुपये १०० सदर संस्थेला/शाळेला/विद्यालयाला परत न करता शासकीय कोषागारात जमा करण्यात येईल.

(इ) बाल नाट्यस्पर्धेत प्रथम क्रमांकाची पारितोषिके मिळविणाऱ्या संस्थाना/शाळेला/विद्यालयांना स्पर्धेनंतर शासनाने सांगितल्यास एक किंवा अधिक प्रयोग करावे लागतील.

(ई) (१) बाल नाट्यस्पर्धेच्या अंतिम फेरीत ठराविक एका विभागात सलग तीन किंवा अधिक वेळा प्रथम पारितोषिक मिळविणाऱ्या कलाकारांना किंवा तंत्रज्ञांना सन्माननीय विजेते समजण्यात येईल व त्यांना त्या ठराविक एका विभागाकरिता त्यानंतर पुढील पारितोषिकास अपात्र ठरविण्यात येईल. यात नाट्य लेखकांचा समावेश नसेल.

(२) बाल नाट्यस्पर्धेत सादर होणाऱ्या बाल नाटकात काम करणाऱ्या कलाकार व तंत्रज्ञ इत्यादीना महाराष्ट्र शासनाच्या इतर नाट्यस्पर्धेतील नाटकात काम करता येणार नाही.

(३) संस्थेच्या/शाळेच्या/विद्यालयाच्या प्रवेशिकेचा नाट्यस्पर्धेसाठी स्वीकार करण्यात आल्यावर आयुक्त/संचालक, सांस्कृतिक कार्य यांच्या पूर्वसमंतीशिवाय नाटकात भाग घेणाऱ्या कलाकारांच्या यादीत बदल करता येणार नाही.

(४) नाट्यसंस्थेस/शाळा/विद्यालयास शासनाकडून सुचविण्यात आल्यास, नाटकातील काही भाग किंवा वाक्ये गाळावी लागतील.

(५) अंतिम नाट्यस्पर्धेत संस्थेला/शाळेला/विद्यालयाला पहिल्या किवा दुसऱ्या पारितोषिकाकरिता अनुक्रमे कमीत कमी ६५ टक्के व ६० टक्के गुण मिळविणे आवश्यक आहेत.

(६) संस्थेने/शाळेने/विद्यालयाने सरासरी २५ टक्के पेक्षा कमी गुण सतत दोन वर्ष मिळविल्यास ती संस्था, शाळा, विद्यालय नाट्यस्पर्धेमध्ये भाग घेण्यास एक वर्षाकरिता अपात्र ठरविण्यात येईल.

(७) स्पर्धेच्या पारितोषिकाविषयी शासनाने घेतलेला निर्णय अंतिम राहील.

(८) संस्थेने/शाळे/विद्यालयाने त्यांनी दिलेल्या प्रवेशिकेतील नियम व अटींचे बरोबर अनुकरण न केल्यास ती संस्था पुढील नाट्यस्पर्धेमध्ये भाग घेण्यास अपात्र ठरविण्यात येईल.

(९) कुठलेही कारण न देता एखादी प्रवेशिका रद्द करण्याचा अधिकार शासनास राहील.

### ६. महाराष्ट्र राज्य बाल नाट्य स्पर्धा--प्रादेशिक फेरीसाठी पारितोषिके

| | | रक्कम |
|---|---|---|
| संस्थेकरिता पारितोषिके . . | प्रथम पारितोषिक | ३,००० |
| | द्वितीय पारितोषिक | २,००० |
| | अपंग बाल नाट्य संस्थेकरिता उत्तेजनार्थ . . | २,००० |
| दिग्दर्शनाची पारितोषिके . . | प्रथम पारितोषिक . . | १,००० |
| | द्वितीय पारितोषिक | ५०० |
| | अपंग बाल नाट्य संस्थेकरिता उत्तेजनार्थ | ५०० |
| नेपथ्य रचना . . | प्रथम पारितोषिक . . | ७०० |
| | द्वितीय पारितोषिक . . | ५०० |
| प्रकाश योजना . . | प्रथम पारितोषिक . . | ७०० |
| | द्वितीय पारितोषिक . . | ५०० |
| रौप्यपदके . . | उत्कृष्ट अभिनयासाठी . . | १,००० |
| | पुरुष बाल कलाकारांसाठी एक व स्त्री. कलाकारांसाठी एक अशी दोन रौप्य पदके व प्रत्येकी रु. ५००. | |
| | एकूण रुपये . . | १२,४०० |

(एकूण रुपये बारा हजार चारशे फक्त)

| | | |
|---|---|---|
| गुणवत्ता | . . | प्रत्यक्षपणे सादर होणाऱ्या नाटकांच्या संस्थेचा विचार करून हे प्रमाण खालीलप्रमाणे ठरविण्यात येत आहे :— |
| १ ते १० नाटके | . . | ३ पुरुष बाल कलाकार + ३ स्त्री बाल कलाकार = ६ |
| ११ ते २० नाटके | . . | ४ पुरुष बाल कलाकार + ४ स्त्री बाल कलाकार = ८ |
| २१ च्या पुढील नाटके | . . | ५ पुरुष बाल कलाकार + ५ स्त्री बाल कलाकार = १० |

प्रदेशिक नाट्य स्पर्धेत पारितोषिक मिळविण्याकरिता कमीत कमी गुणांची टक्केवारी ठरविलेली नसून गुणवत्तेनुसार येणारी पहिली दोन नाटके परितोषिकांकरिता पात्र ठरतील.

## ७. महाराष्ट्र राज्य बाल नाट्य स्पर्धा-अंतिम फेरीसाठी पारितोषिके

| | | रक्कम |
|---|---|---|
| संस्था/शाळा/विद्यालयाकरिता | प्रथम पारितोषिक . . | ११,००० |
| | द्वितीय पारितोषिक . . | ७,००० |
| | तृतीय पारितोषिक . . | ५,००० |
| | अपंग बाल नाट्य संस्थेकरिता उत्तेजनार्थ . . | ५,००० |
| दिग्दर्शन | प्रथम पारितोषिक . . | २,००० |
| | द्वितीय पारितोषिक . . | १,५०० |
| | तृतीय पारितोषिक . . | १,००० |
| | अपंग बाल नाट्य संस्थेकरिता उत्तेजनार्थ . . | १,००० |
| नेपथ्य रचना | प्रथम पारितोषिक . . | १,५०० |
| | द्वितीय पारितोषिक . . | १,००० |
| प्रकाश योजना | प्रथम पारितोषिक . . | १,५०० |
| | द्वितीय पारितोषिक . . | १,००० |
| पार्श्वसंगीत | प्रथम पारितोषिक . . | १,५०० |
| | द्वितीय पारितोषिक . . | १,००० |
| वेषभूषा | प्रथम पारितोषिक . . | १,५०० |
| | द्वितीय पारितोषिक . . | १,००० |

| | | | |
|---|---|---|---|
| रंगभूषा | प्रथम पारितोषिक | . . | १,५०० |
| | द्वितीय पारितोषिक | . . | १,००० |
| लेखन | प्रथम पारितोषिक | . . | १,५०० |
| | द्वितीय पारितोषिक | . . | १,००० |

**अभिनयासाठी वैयक्तिक पारितोषिके व रौप्यपदक** . . ७,०००

उत्कृष्ट अभिनयासाठी स्त्री-५ बाल आणि पुरुष-५ बाल
कलाकारांसाठी प्रत्येकी रुपये ७०० प्रमाणे अशी १० पारितोषिके + रौप्यपदक
अभिनयक गुणवत्ता प्रमाणपत्रे एकूण २० स्त्री व पुरुष बाल कलाकारांसाठी

(एकूण रुपये पंचावन्न हजार पाचशे फक्त) एकूण रुपये . . ५५,५००

**परीक्षक नियुक्ती, परीक्षकांचे मानधन प्रवास खर्च व दैनिक भत्ता**

८. (अ) बाल नाट्यस्पर्धेच्या प्राथमिक फेरीच्या प्रत्येक केंद्रावर तीन प्रमाणे नाट्यक्षेत्रातील तज्ज्ञ परीक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. तसेच अंतिम फेरीसाठी परीक्षक म्हणून नाट्य क्षेत्रातील ५ तज्ज्ञ व्यक्तींची नियुक्ती आयुक्त/संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई करतील.

(आ) बाल नाट्यस्पर्धेसाठी प्रत्येक परीक्षकास प्रतिदिन रुपये १५१ प्रमाणे मानधन मंजूर करण्यात येईल.

(इ) बाल नाट्य स्पर्धा मुंबईत आयोजित करण्यात आल्यास आणि बृहन्मंबईतील स्थानिक परीक्षक नेमण्यात आले तर (१) शीव किंवा माहिम खाडीच्या अलीकडे रहाणाऱ्या परीक्षकांना जाण्या-येण्याचा प्रवास खर्च किंवा रुपये १०० यापैकी कमी असलेली रक्कम आणि (२) शीव व माहिम खाडीच्या पलीकडे रांहणाऱ्या परीक्षकांना जाण्या-येण्याचा प्रवास खर्च किंवा रुपये १५० यापैकी कमी असलेली रक्कम मंजूर करण्यात येईल.

(ई) मुंबई बाहेरून आलेल्या परीक्षकांना मुंबईतील वास्तव्यास एक दिवसाचा निवास/भोजन व्यवस्था, अंतर्गत प्रवास खर्च यासाठी रुपये २०० व त्यांचे निवासस्थान ते मुंबई व परतीच्या प्रवासासाठी रेल्वेच्या प्रथम वर्गाचे अथवा एस.टी. चे प्रत्यक्ष भाडे स्वतंत्रपणे मंजूर करण्यात येईल.

(उ) मुंबई व्यतिरिक्त इतर ठिकाणी नियुक्त केलेल्या बाहेर गावाहून येणाऱ्या परीक्षकांना मुंबई नागरी सेवा नियमातील प्रचलित तरतुदीनुसार देय दराने प्रवास भत्ता व दैनिक भत्ता मंजूर करण्यात येईल.

(ऊ) मुंबई व्यतिरिक्त इतर ठिकाणी नियुक्त केलेल्या स्थानिक परीक्षकांना बाल नाट्य स्पर्धेच्या नाट्यगृहात पोहचण्यासाठी प्रत्यक्ष प्रवास खर्च किंवा रुपये २५ यापैकी कमी असेल ती रक्कम मंजूर करण्यात येईल.

९. बाल नाट्यस्पर्धेच्या वेळी प्रौढांसाठी रुपये ७ व रुपये ५ व १५ वर्षांखालील मुलांसाठी रुपये ३ व रुपये २ दराची दैनिक तिकीटे ठेवण्यात येतील. संबंधित स्पर्धक नाट्यसंस्थेस त्याच्या नाटकांच्या तिकीट विक्रीपासून मिळालेल्या एकूण रकमेच्या ५० टक्के रक्कम अदा करण्यात येईल.

१०. यासाठी आयुक्त/संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या दुय्यम अधिकाऱ्यास या संबंधीच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

११. यावर होणारा खर्च '' २२०५, कला व संस्कृती, १०२, कला व संस्कृती यांचे प्रचालन (०२) (०१) राज्य नृत्य, नाट्य, तमाशा व संगीत महोत्सव (२२०५-०७१६) – २० इतर खर्च, मागणी क्र. एन ३ '' या अर्थशीर्षाखाली त्या त्या वर्षी मंजूर करण्यात येणाऱ्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून भागविण्यात यावा.

# महाराष्ट्र राज्य बाल नाट्यस्पर्धा–प्रवेशिका

## परिशिष्ट '' ब ''

महाराष्ट्र राज्य बाल नाट्यस्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या नाट्य संस्थांनी ही प्रवेशिका संपूर्ण भरुन त्या सोबत अनामत रक्कम रु. १०० चा धनाकर्ष संचालक, सांस्कृतिक कार्य, जुने सचिवालय, विस्तार भवन, पहिला मजला, महात्मा गांधी मार्ग, मुंबई ४०० ०३२. यांच्याकडे दिनांक २३ ऑक्टोबर २००२ पूर्वी पाठवावी. त्यानंतर येणाऱ्या प्रवेशिका स्वीकृत केल्या जाणार नाहीत. प्रवेशिकांची पूर्ती करण्यासाठी आवश्यक असलेली खालील सर्व माहिती, नाटकांच्या प्रती वगैरे प्रवेशिकेसोबत सादर केलेली नसल्यास, ती प्रवेशिका स्वीकारली जाणार नाही.

१. संस्थेचे / शाळेचे / विद्यालयाचे नाव . .

२. पूर्ण कायमचा पत्ता . .

संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक . .

३. अपंग बाल नाट्यसंस्था असल्यास, तसा उल्लेख . . होय/नाही

४. प्रवेशिकेसोबत रु. १००/- ची अनामत रक्कम जमा करण्यात आली आहे किंवा नाही. असल्यास, धनाकर्ष क्रमांक व दिनांक नमूद करणे.

५. संस्था स्थापन झाल्याची तारीख

६. संस्था नोंदणीकृत आहे किंवा नाही. असल्यास, नोंदणी क्रमांक व दिनांक नमूद करणे.

७. संस्थेच्या घटनेत सांस्कृतिक कार्याची अभिवृद्धी हा एक उद्देश आहे किंवा नाही किंवा संस्थेच्या घटनेतच घटनात्मक रीत्या स्थापन झालेला असा बाल नाट्य विभाग आहे किंवा कसे (सोबत घटनेची प्रत जोडणे).

८. स्पर्धेत सादर करावयाच्या नाटकाचे व त्याच्या लेखकाचे नाव

९. नाटकाचा विषय (पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक किंवा इतर)

१०. नाटक नवीन असल्यास व ते बाल नाट्यमहोत्सवासाठी खास लिहिलेले असल्यास तसा स्पष्ट उल्लेख करणे.

११. नाटक स्वतंत्र, भाषांतरीत/रूपांतरीत किंवा आधारित असल्यास मूळ नाटकाचे व नाटककाराचे नाव व त्याची भाषा देणे. नाटक एखाद्या कादंबरीवर किंवा लघुकथेवर आधारीत असल्यास मूळ कथेचे किंवा कादंबरीचे नाव, लेखकाचे नाव व त्याची भाषा देणे.

१२. स्पर्धेसाठी सुचविण्यात आलेल्या नाटकासाठी नाटक-काराचे परवानगी पत्र सोबत जोडलेले आहे किंवा नाही. नाटक भाषांतरीत, रूपांतरीत किंवा आधारीत असल्यास मूळ लेखकाचे अनुमती पत्र सोबत जोडणे.

१३. सादर करावयाच्या नाटकाचा प्रथम प्रयोग या स्पर्धेत होणार असल्यास, तसा उल्लेख करणे.

१४. बाल नाट्यस्पर्धेत सादर करावयाच्या बाल नाटकाची प्रत सोबत जोडण्यात आलेली आहे किंवा नाही.

१५. बाल नाट्यस्पर्धेत सादर करण्यात येणाऱ्या नाटकासाठी रंगभूमी प्रयोग पूर्व परिनिरीक्षण मंडळाचे प्रमाणपत्र सोबत जोडलेले आहे किंवा नाही त्याचा क्रमांक व दिनांक नमूद करणे.

१६. ह्यापूर्वी बाल नाट्यस्पर्धेत सादर करण्यात आलेल्या नाटकांसाठी संस्थेला / शाळेला / विद्यालयाला पारितोषिके मिळालेल्या नाटकांची सविस्तर माहिती द्या.

| | नाटकाचे नाव | वर्ष | क्रमांक | पारितोषिक रक्कम |
|---|---|---|---|---|
| (१) | | | | |
| (२) | | | | |
| (३) | | | | |

१७. मध्यंतरासह नाटकासाठी लागणारा वेळ.(मध्यंतरासाठी किती वेळ लागणार तेही लिहावे.)

शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्रमांक बानास्प/२००२/प्र.क्र. २/सां.कां.-१, दि. १७ ऑगस्ट २००२ प्रमाणे प्रवेशिकेसोबत रु. १००/- ची अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे. संस्थेने अनामत रक्कम भरलेली नसल्यास, प्रवेशिका रद्द समजण्यात येईल.

बाल नाट्यस्पर्धेच्या नियमांप्रमाणे ज्या नाट्यसंस्था पात्र असतील त्यानांच नाट्यस्पर्धेत भाग घेण्याची परवानगी देण्यात येईल. कोणतेही कारण न देता प्रवेशिका नाकारण्याचा हक्क शासनाकडे राहील.

आम्ही प्रतिज्ञापूर्वक सांगतो की,

(१) वर देण्यात आलेली माहिती सत्य व बरोबर आहे.
(२) आम्ही सादर करीत असलेल्या बाल नाटकात सर्व कलावंत संस्थेचे सभासद आहेत.
(३) आम्ही बाल नाट्यस्पर्धेच्या सर्व अटी व नियम वाचले आहेत आणि त्या सर्वांचे पालन करीत आहोत.
(४) बाल नाट्यमहोत्सवाचे नियम आम्हाला बंधनकारक आहेत.
(५) बाल नाट्यस्पर्धेसाठी आमचे नाटक निवडण्यात आल्यास दिलेल्या ठिकाणी, दिलेल्या तारखेला व दिलेल्या वेळेला आम्ही ते न चुकता सादर करू.
(६) काही अपरिहार्य कारणाने बाल नाट्यस्पर्धा पुढे ढकलण्यात आल्यास किंवा रद्द झाल्यास संस्थेच्या झालेल्या कुठल्याही खर्चास शासन जबाबदार राहणार नाही.
(७) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक बानास्प-२००२/प्र.क्र. ८४/सां.का. १, दिनांक १७ ऑगस्ट २००२ प्रमाणे ऐनवेळी संस्थेने प्रयोग रद्द केल्यास, प्रवेशिकेसोबत भरलेली रु. १००/- ची अनामत रक्कम जप्त करून शासकीय कोषागारात जमा करावी.

..........................................................

संस्थेच्या अध्यक्षांची किंवा विद्यालयाच्या
किवा शाळेच्या मुख्याध्यापकांची स्वाक्षरी.

ठिकाण :

..........................................................

दिनांक :

संस्थेच्या सचिवांची स्वाक्षरी.

# महाराष्ट्र राज्य बाल नाट्यस्पर्धा

(ही माहिती प्रवेशिकेसोबत व नंतर काही बदल झाल्यास बाल नाट्यस्पर्धा सुरू होण्यापूर्वी तीन आठवडे अगोदर पाठविली पाहिजे.)

महाराष्ट्र राज्य बाल नाट्यमहोत्सवांतर्गत बाल नाट्यस्पर्धेत आम्ही सादर करीत असलेल्या नाटकांतील पात्र योजना, दिग्दर्शन आदीसंबंधीची माहिती खालीलप्रमाणे :–

१. पात्र योजनेची माहिती - (खाली दिलेल्या नमुन्यानुसार, वाटल्यास वेगळ्या कागदावर माहिती प्रवेशिकेसोबत भरून पाठवावी.)

संस्थेचे नाव :

नाटकाचे नाव :

| भूमिका | कलाकारांचे नाव | कलाकाराचे वय | संस्थेचा सभासद आहे किंवा नाही |
|---|---|---|---|
| (१) | | | |
| (२) | | | |
| (३) | | | |
| (४) | | | |
| (५) | | | |
| (६) | | | |
| (७) | | | |
| (८) | | | |
| (९) | | | |
| (१०) | | | |
| (११) | | | |
| (१२) | | | |
| (१३) | | | |
| (१४) | | | |
| (१५) | | | |
| (१६) | | | |
| (१७) | | | |
| (१८) | | | |
| (१९) | | | |
| (२०) | | | |

२. नाटकाचे दिग्दर्शन, संगीत दिग्दर्शन, प्रकाशयोजना, नेपथ्य, रंगभूषा, वेशभूषा करणाऱ्या व्यक्तिंची नावे :-

| नाटकाचे नाव | दिग्दर्शक | संगीत दिग्दर्शक | प्रकाशयोजना | नेपथ्य | रंगभूषा | वेशभूषा |
|---|---|---|---|---|---|---|

प्रमाणित करण्यात येते की, बाल नाटकात काम करणारे सर्व कलाकार व तंत्रज्ञ हे संस्थेचे सभासद आहेत.

ठिकाण :

दिनांक :

....................................................      ....................................................

संस्थेच्या सचिवांची स्वाक्षरी व शिक्का.

संस्थेच्या अध्यक्षांची किंवा विद्यालयाच्या किंवा शाळेच्या मुख्याध्यापकांची स्वाक्षरी व शिक्का.

# महाराष्ट्र राज्य बाल नाट्यस्पर्धा

## प्रादेशिक/अंतिम स्पर्धेसाठी गुणपत्रक

## परिशिष्ट '' क ''

परीक्षकाचे नाव ..............................

पत्ता ..............................

..............................

केंद्र ..............................

नाटकाचे नाव ..............................

संस्थेचे नाव ..............................

| अभिनय गुण – ४०<br>खालीलप्रमाणे प्रत्येकी १० गुण | निर्मिती गुण –४० | एकंदर प्रतिक्रिया<br>गुण – २० |
|---|---|---|
| (१) भावना प्रकटन व भूमिकेची समज<br>(२) भूमिकेचे शारीरिक प्रकटन<br>(३) वाचिक प्रकटन<br>(४) सांघिक नाट्यकार्यात सहभाग<br><br>नाटकाला मध्यंतरासह एकूण लागलेला वेळ––<br>पहिला अंक सुरू झाल्याची वेळ––<br>दुसरा अंक संपल्याची वेळ––<br>एकूण वेळ : | (अ) पात्रयोजना<br>(आ) रंगमंचावरील व्यापार<br>(इ) रंगभूमीवरील पात्रांची रचना.<br>(ई) नाट्यप्रसंगातील चित्र-संगती.<br>(उ) उत्कर्ष बिंदू साधण्याचे प्रयत्न.<br>(ऊ) नाट्यार्थाची समज<br>(ए) सादरीकरण<br>(ऐ) रंगभूषा आणि वेशभूषा<br>(ओ) नेपथ्य<br>(औ) प्रकाश योजना | एकूण गुण १००<br>परीक्षकाची सही :<br><br>तारीख : |

**टीप**––स्पर्धेत सादर होणाऱ्या नाटकातील कोणत्याही विभागासाठी पारितोषिक विभागून देण्यात येऊ नये. विभागासाठी एकापेक्षा जास्त कलावंत असतील तर क्रमवारीतील प्रथम क्रमांकाच्या नावाचाच पारितोषिकासाठी विचार करावा. याबाबत परीक्षकांनी काटेकोरपणे पालन करावे.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई